# भोवरा

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**भोवरा : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २२०/-

# भोवरा

# १

''मधुताई अहो मधुताई!''

कारखान्याचे मॅनेजर दाणीदादा यांची हाक ऐकल्याबरोबर माडीवरच्या खोलीत कामात गुंतलेल्या मधुमालतीनं स्वत:शी उद्‌गार काढला, 'अगंबाई! मुंबईच्या फोटोग्राफरना दाणीदादा घेऊन आले वाटतं!' तिच्या चेहऱ्यावर एकदम आनंद पसरला....

तिचे वडील नानासाहेब यांच्या एकसष्टीचा समारंभ मोठ्या प्रमाणावर साजरा व्हायचा होता. नानासाहेबांनी काढलेल्या कारखान्याचा अकरावा वाढदिवस, आणि त्यांची स्वत:ची एकसष्टी, अशा जोड निमित्तानं होणाऱ्या उत्सवाची तयारी गेले कित्येक दिवस चालली होती. उत्सव समितीनं नानासाहेबांना एक गौरव ग्रंथ अर्पण करण्याचं ठरविलं होतं. या ग्रंथात कारखान्याचा दहा वर्षांचा इतिहास देण्यात यावयाचा होता, मूळच्या 'जनाई' गावाला तांबेनगराचं स्वरूप कसं प्राप्त झालं त्याची हकीगत लिहिली जाणार होती, कारखान्याचे, मुख्य पदाधिकाऱ्यांचे, कामगारांचे तांबेनगरातील शाळा, ऑफिसर लोकांचे छोटे टुमदार बंगले, कामगारांसाठी बांधलेली घरं, छोटंसं नाट्यगृह, खेळण्याचं मैदान, हॉस्पिटल, पोस्ट ऑफिस, बँक इत्यादी इमारतींचे, आणि स्वत: नानासाहेब व त्यांची एकुलती एक तरुण कन्या मधुमालती यांचे फोटो ग्रंथात छापण्याची योजना होती. दाणीदादांचा उत्साह दांडगा. नानासाहेब तांब्यांच्याविषयी त्यांच्या मनातला आदर अमर्याद. तांबेनगर कारखान्यातले कामगार नानासाहेबांना 'धनी' म्हणत ते बहुतांशी त्या नावाची त्यांना सवय झाली होती म्हणून;

परंतु दाणीदादांच्या तोंडून हे नाव बाहेर पडे ते गाढ भावनांनी ओथंबलेलं. नानासाहेबांचं कतृत्व, त्यांचं सौजन्य, त्यांची दानशूरता, त्यांची परोपकारबुद्धी, त्यांचा साधेपणा, त्यांचा प्रेमळ स्वभाव या सगळ्याविषयी दाणीदादांच्या मनात असलेला आदर 'धनी' या त्यांच्या तोंडच्या शब्दात एकवटलेला असे. कारखान्याचा अकरावा वाढदिवस आणि नानासाहेबांची एकसष्टी असा जो गोड समारंभ होणार होता, त्याच्या थाटात कसलीदेखील उणीव राहता कामा नये, प्रत्येक गोष्ट पहिल्या दर्जाची झाली पाहिजे अशी दाणीदादांची इच्छा आणि धडपड. फोटोचा विषय निघाला होता तेव्हा ते म्हणाले होते,

''फोटो असे तसे काढायचे नाहीत. फर्स्ट क्लास काम झाले पाहिजे! आपण असं करू या, मुंबईच्या एखाद्या नामांकित फोटोग्राफरला इकडे आणून काम करून घेऊ.''

कुणी तरी शंका काढली होती, ''खर्च फार नाही का येणार?''

दाणीदादांनी ती शंका धुडकावून लावली होती, ''येऊ दे रे आला तर! असे प्रसंग काय वरचेवर येणार आहेत? हयातीत एकदाच होणारं काम आहे हे. ते उत्तमातलं उत्तम झालं पाहिजे हा मुद्दा. खर्चाला काय भिता? 'बरकत स्टुडिओ' चे फोटो तुम्ही पाहिले आहेत ना? काय सुंदर असतात, नाही का? त्याचा मालक केकी इराणी माझ्या थोडासा ओळखीचा आहे. थोड्या सवलतीच्या दरानं हे काम कर म्हटलं तर तो नाही म्हणायचा नाही. त्याला विचारू का?''

कार्यकारी समितीच्या सभासदांनी संमती दिली होती, आणि दाणीदादांनी केकीशी पत्रव्यवहार करून फोटो काढण्याच्या कामासाठी त्याला चार दिवस तांबेनगरला राहण्यासाठीच पाचारण केलं होतं.

मधुमालतीला हे सर्व माहीत असल्यामुळे, आणि 'उद्या सकाळी केकी इराणी येणार बघा मधुताई' अशी बातमी त्यांनी आदल्या दिवशीच दिली असल्यामुळे त्यांची हाक ऐकल्याबरोबर तिनं ओळखलं की, ज्या अर्थी दादांच्या हाकेत नेहमीपेक्षा अधिक खणखणीतपणा आहे त्या अर्थी मुंबईच्या फोटोग्राफरला घेऊन ते आले असावेत...केकी इराणीची प्रशंसा करताना दादांनी त्याच्या अनेक हकीगती मधुमालतीला सांगितल्या होत्या. ते म्हणाले होते, ''त्याच्या प्रसिद्धीवरून कुणाला वाटेल चांगला उतार वयाचा असावा केकी इराणी. परंतु खरोखर तो आहे पंचविशीच्या आसपासचा तरुण. जितका कसबी तितकाच स्वभावानं लहरी आणि पोशाखात,



खाण्यापिण्यात, वागण्यात चक्रमपणा करणारा आहे. येवढा परदेशातून शिकून आलेला, पण पोषाख असा गबाळा करतो की काही विचारू नकोस. बिन इस्त्रीची भोंगळ पँट घालतो. अंगात बुशकोटसारखं लांडं कुडतं असतं ते एखाद्याला वाटेल गोणपाटाचंच शिवलेलं आहे. पायात घालतो अस्सल कोल्हापुरी पायताण. कोल्हापूरच्या महाराजांची शिकारीच्या निमित्तानं ओळख झाल्यापासून या कोल्हापुरी वहाणा त्याला आवडायला लागल्या. स्वारीच्या डोक्यावरचे केस सदा अशा अवस्थेत असतात की केस विंचरण्यासाठी फणी नावाची काही वस्तू वापरता येते हे याला अजून ठाऊकच नाही अशी शंका यावी. आणि या वाकड्या तिकड्या अवतारावर कळस म्हणजे बाळाची अणुकुचीदार छोटी दाढी! पायातल्या वहाणा म्हणजे ज्याप्रमाणे कोल्हापुराचा प्रसाद, त्याचप्रमाणे केकीची दाढी म्हणजे तो पॅरिस शहरी काही दिवस शिकत होता याची त्यानं मुद्दाम हौसेनं ठेवलेली निशाणी!...'' दाणीदादांच्या तोंडची केकी इराणीची असली वर्णनं ऐकल्यामुळे केकीचं दर्शन घ्यायला मधुमालती फार उत्सुक होती....

दादांची हाक ऐकल्याबरोबर 'अगंबाई! मुंबईच्या फोटोग्राफरना घेऊन आले वाटतं दादा!' असा स्वत:शी उद्गार काढून तिनं हातातलं काम दूर टाकलं. खिडकीकडे धावून ती खाली वाकली आणि ओरडून म्हणाली, ''आले हो आले दादा!'' तिनं पाहिलं तो दादा अंगाणातून बंगल्याच्या व्हरांड्याकडे येत होते. त्यांच्या मागोमाग पावलं टाकणारा केकी इराणीच असल्याचं तिला सहज ओळखता आलं. केकीच्या पाठोपाठ एक अगदी ठेंगणा, केसाळ, पिंगट रंगाचा, चोचीसारख्या तोंडाचा कुत्रा तुरूतुरू चालला होता, तो केकीचाच असावा खास... मधुमालतीच्या मनात आलं, केकीची वर्णनं करताना त्याच्या कुत्र्याच्या आवडीचं वर्णन करायला दादा विसरले म्हणायचे! इतकं छोटं, इतकं केसाळ आणि इतकं देखणं कुत्रं मधुमालतीनं पूर्वी कधी पाहिलंही नव्हतं.... खाली धावत जाण्यापूर्वी तिनं ते विलक्षण तरतरीत केसाळ कुत्रं आणि त्याचा फिस्कारलेल्या केसांचा दाढीवाला मालक, दोघांकडेही भरपूर पाहून घेतलं....

''नानासाहेब आहेत की नाहीत घरात?'' व्हरांड्याच्या पायऱ्या चढण्यापूर्वी दाणीदादांनी विचारलं.

''नाहीत. पण लवकर येतो असं सांगून गेले आहेत.'' मधुमालतीनं उत्तर दिलं.

''हे मुंबईचे पाहुणे. केकी इराणी. नानासाहेब तांब्यांच्या कन्या मधुमालती.'' दाणीदादांनी उभ्या उभ्या दोघांचा परस्पर परिचय करून दिला.

मधुमालतीनं नमस्कार केला. ''या ना.'' असं म्हणून ती जिन्याकडे वळली.

वरच्या बैठकीच्या खोलीत बसण्यापूर्वी केकीची नजर चारी भिंतीवरून फिरली. हे लक्षात आल्यामुळे दाणीदादांनी खुलासा केला, ''एका अत्यंत साध्या माणसाचं घर आहे हे. इथे तसबिरी फोटो काही आढळायचं नाही तुम्हाला केकीसाहेब.''

नानांच्या ज्या साधेपणाबद्दल गौरवानं बोलल्यासारखे दादा बोलले तो साधेपणा केकीच्या कलात्मक दृष्टीनं उणेपणच ठरण्यासारखा होता, असा विचार मनात आल्यामुळे मधुमालती जराशी शरमली, गोंधळली. तिनं केकीकडे पाहण्याचं टाळलं.

परंतु केकी म्हणाला, ''अशा साध्या राहणीची माणसंदेखील मला आवडतात.''

मधुमालतीनं त्याच्याकडे नजर केली तेव्हा तो मुद्दाम तिला बरं वाटावं म्हणून हसल्यासारखं हसत होता.

त्याचा कुत्रा उडी मारून कोचावर त्याच्याजवळ बसण्याच्या बेतात होता. परंतु केकीनं त्याला इंग्रजीत आज्ञा केली, ''नाही नाही ड्यूक! रीतभात समजते का तुला? कोचावर नाही बसायचं. तिथे दूर पडून राहा पाहू.''

केकीनं चुटकी वाजवून दिशा दाखविल्याबरोबर त्या कुत्र्यानं शरमेनं खाली मान घातली, आणि दूर बैठक मारून केकीकडे बघून शेपटी हलविली. जणू तो म्हणाला, जशी तुमची आज्ञा, ऐकलं की नाही मी? केकीनंही त्याला इंग्रजीत शाबासकी दिली, ''मोठा शहाणा आहे आमचा ड्यूक.''

दादांनी विचारलं, ''ड्यूक काय याचं नाव?''

''या:!''

'यस्' च्या ऐवजी 'या:' असा उद्‌गार केकीनं काढलेला पाहून मधुमालतीला क्षणभर आश्चर्य वाटलं. पण कुणी तरी सांगितलेलं तिला आठवलं, की फ्रान्समध्ये राहून आलेली कित्येक माणसं इंग्रजी 'यस्' च्या ऐवजी 'या:!' म्हणतात.

तिनं हसत विचारलं, ''ड्यूक खरा, पण कुठला ड्यूक?''

''नुसताच ड्यूक.'' केकी म्हणाला, ''वाटल्यास ड्यूक ऑफ विंडसर समजा.''



''पण याला ड्यूक ऑफ विंडसर म्हटलं की जिच्यासाठी यानं राज्यत्याग केला अशी एखादी डचेस हवी ना?''

केकी मनापासून हसला, आणि आपल्या फिस्कारलेल्या केसांतून बोटं फिरवीत इंग्रजीत म्हणाला, ''वा वा! फार छान बोलतात. आमच्या ड्यूकला अजून काही सिम्पसनबाईसारखी डचेस मिळालेली नाही. आता इथे तुमच्या गावी मिळाली तर बघायची. हो ना रे ड्यूक?''

ड्यूकनं कान टवकारले, मान हलविली, आणि तो मोठ्यांदा भुंकला.

केकी म्हणाला, ''माझी सूचना त्याला पसंत आहे बघा.''

दादा आणि मधुमालती दोघांनाही खूप हसू आलं.

तितक्यात खालच्या अंगणातली चाहूल ऐकून मधुमालती म्हणाली, ''नाना आले वाटतं.'' ती उठली, आणि खाली गेली.

नानासाहेब वर आले तेव्हा मधुमालती त्यांच्याबरोबर नव्हती. ती थोड्या वेळानं वर आली ती कॉफीचे पेले आणि फराळाचं सामान ट्रेमधे घेऊनच.

इकडल्या तिकडल्या गप्पा झाल्यावर दादांनी केकीला विचारलं, ''काय तुमच्या कामाला केव्हा सुरुवात करणार?''

केकी म्हणाला, ''केव्हाही! मी तर माझे कॅमेरे गळ्यात अडकवून तयारच आहे.''

आधी कारखान्याचे आणि निरनिराळ्या इमारतींचे फोटो काढता की नानासाहेबांचा आणि मधुताईंचा फोटो काढता?''

''जशी तुमची इच्छा!''

नानासाहेब म्हणाले,''अरे दादा, माझा कसला फोटो काढतोस?''

''म्हणजे काय? तुम्ही तर या सोहळ्याचे उत्सवमूर्ती आहात. येवढा नावारूपाला आलेला हा कारखाना स्वर्गातून खाली पडला होय? जनाई गावाच्या जमिनीत तुम्ही या कारखान्याचं बी पेरलंत, उद्योग आणि पैसा यांचं खत घातलंत म्हणूनच हा सुंदर कारखाना आज इथे दिसतो आहे ना? दहा वर्षांपूर्वी इथं काय होतं? नुसतं माळरान! आज या घटकेला त्या माळरानाला तांबेगनरचं स्वरूप आलंय् ते कुणामुळे?''

नानासाहेब चटकन म्हणाले, ''अरे दादा, तुझ्यासारखी गुणी माणसं, आणि माझ्यावर श्रद्धा ठेवणारे कामगार यांच्यामुळे!''

दाणीदादादेखील चटकन म्हणाले, ''छे छे धनी! कारखान्याचं श्रेय तुम्ही कामगारांना देता हा तुमचा मोठेपणा. त्यांनी तुमच्यावर श्रद्धा ठेवली म्हणता, ती काय उगाच ठेवली? कारखान्याच्या इतिवृत्तात आणि तुमच्या गौरव ग्रंथात तुमचे फोटो पाहिजेतच.''

''इतका मोठा नाही रे बाबा मी. कारखाना म्हणजेच खरं दैवत. मी केवळ या देवळातला पुजारी आहे!''

''ठीक आहे! पण आम्हाला देवळाबरोबर पुजाऱ्याचाही फोटो हवा आहे. मग काय म्हणता?''

''आता काय म्हणावं या हटवादी वेड्याला?'' अशा अभिप्रायानं नानासाहेबांनी बघितलं. केकीच्या मुद्रेवर हास्य दिसलं. 'बघ तुझ्या बापाला कसं निरुत्तर केलं ते' अशा अर्थानं दाणीदादांनी मधुमालतीकडे बघितलं, आणि 'माहीत आहे. येवढा नको काही गर्व मिरवायला' अशा अर्थानं तिनं मुरका मारला तेव्हा ते मोठमोठ्यांदा हसू लागले.

दाणीदादा असे हसू लागले की त्यांच्या अंगाची व चेहऱ्याची ठेवणच किती विनोदी होती ते पाहणाऱ्याच्या विशेष लक्षात येत असे. नानासाहेबांच्या विषयी अमर्याद निष्ठा, आदर आणि प्रेम हा दाणीदादांच्या स्वभावातील स्थायीभाव होता. परंतु त्याचप्रमाणे आनंदीपणा, उत्साह, चेष्टामस्करीची देवाणघेवाण करण्याची हौस हे त्यांच्या ठिकाणाचे गुणही न लपण्यासारखे होते. त्यांचं ठेंगणं, किंचित स्थूल शरीर, चमकदार परंतु काहीसे बारीक भासणारे डोळे, गोरं नाक, एखाद्या कचकड्याच्या बाहुल्याप्रमाणे भासणारे गुळगुळीत गाल, वयाच्या चाळिशीतच डोक्याला पडलेलं टक्कल यामुळे आणि सैल बोंगेदार पोषाख करण्याच्या त्यांच्या तऱ्हेमुळे त्यांचा एकंदर चेहरामोहरा आणि पवित्राच गमत्या आणि विनोदी वाटण्यासारखा होता.तांबेनगरच्या लहानमोठ्या कोणत्याही उद्योगात दाणीदादांचा पुढाकार असायचा. मैदानी खेळाच्या स्पर्धा झाल्या की दाणीदादा शेवटचा नंबर हमखास मिळवायचे. परंतु तरण्या बांडांच्या बरोबर उत्साहानं धावल्याशिवाय कधी राहायचे नाहीत. सार्वजनिक भोजन समारंभ झाला की लाडू, जिलब्या खाण्याच्या शर्यतीतही दाणीदादा हटकून भाग घ्यायचे. आणि दाणीदादांना आग्रह करून वाढण्याच्या वेळेस वाढणारी माणसं आणि दाणीदादा यांचं अक्षरश: हातघाईचं युद्ध व्हायचं ते पाहून आधी पक्वान्नानं भरलेली मंडळीची पोटं हसून हसून दुखू लागायची.



आग्रहाचा हल्ला चुकविण्यासाठी पानात सपशेल लोटांगण घालायचंच काय ते दादा शिल्लक ठेवीत असत. एखादा नाट्यप्रयोग झाला की दादा छोटीशीच का होईना विनोदी भूमिका करणाऱ्यांना हिणवून म्हणायचे, ''अरे, खंडीभर वाक्यं बोलून कुणीही छाप पाडील, पण चार वाक्यांतच टाळी घ्यायला अंगी जन्मजात कसब असावं लागतं.'' 'बेबंदशाही' नाटकात खाशाबाची भूमिका त्यांनी एकदा अशी काही झोकदार वठविली होती की, त्यांच्याशी बरोबरीच्या नात्यानं थट्टामस्करी करणारे मित्र गप्पा रंगत आल्या की पुष्कळदा त्यांना 'खाशाबा' म्हणत असत.... निदान मधुमालतीला तरी दाणीदादा केव्हाही मोठ्यांदा मनापासून हसू लागले की त्यांच्या बेबंदशाही नाटकातल्या त्या कामाचीच आठवण होत असे....

हसणं ओसरल्यावर दाणीदादा केकीकडे वळून म्हणाले, ''हां बोला. आधी नानासाहेबांचे आणि मधुताईचे फोटो काढायचे ठरले. त्यासाठी तुम्हाला काय काय व्यवस्था करून पाहिजे? फोटो कुठे काढणार? इथे या खोलीतच का?''

दाणीदादांच्या प्रश्नाचं उत्तर ठरविण्यापूर्वी प्रकाशाच्या दृष्टीनं खोलीची पाहणी केल्याप्रमाणे केकीनं आजूबाजूस, वर खाली नजर फिरविली. डाव्या हाताचा अंगठा आणि बोटं यांच्या बेचक्यात हनुवटी आणि मुठीत दाढी पकडून धरण्याचा त्याचा चाळा बघून मधुमालती स्वत:शीच हसली. तिच्या मनात आलं, झुबकेदार मिश्यावाले लोक मिश्या पिळण्याचा षोक करतात त्याप्रमाणे दाढीवाल्या माणसाला विचारमग्न अवस्थेत मुठीत अलगद दाढी करून ठेवण्यात काही विशेष प्रेम वाटतं की काय कुणास ठाऊक?....

दाढीवरची मूठ सैल न करता केकीनं निर्णय दिला, ''इथेच घेऊ की फोटो.''

''फर्निचरची काही मांडामांड करायला हवी का?'' दादांनी विचारलं.

''या:!'' असा उद्‌गार काढून केकी उठला. या खिडकीपुढे त्या खिडकीपुढे असा घाईघाईनं नाचला, मग प्रकाशयोजनेचा काही तरी बेत मनाशी पक्का केल्याप्रमाणे त्यानं पुन्हा चुटकी वाजवून 'या:!' असा उद्‌गार काढला. एक साधी खुर्ची उचलून त्यानं एका खिडकीपासून थोड्या अंतरावर ठेवली, आणि नानासाहेबांकडे बघून, ''आपण यावं. इथे बसावं.'' असं इंग्रजीत म्हणून नाटकी अभिनयानं खाली वाकून दोन्ही हात पसरले.

दाणीदादा एकदम केकीच्या अंगावर ओरडले, ''अरे आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलावंता, तुला खुळबिळ लागलंय की काय? या साध्या खुर्चीवर धनी बसणार,